**पुण्य नगरी** 15/03/2026

# यूपीएससी परीक्षेत हर्षवर्धन पाटील याचे देदीप्यमान यश

## यशाबद्दल तुरुकवाडीत फटाके वाजवून आनंदोत्सव साजरा



**कोकरूड : प्रतापराव शिंदे**

अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर तुरुकवाडी पैकी शाहीरवाडी (ता. शाहूवाडी) गावचे सुपुत्र कु. हर्षवर्धन हरिश्चंद्र पाटील याने प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ३४९ वी रँक मिळवून शाहीरवाडी गावासह संपूर्ण शाहूवाडी तालुक्याला अभिमान वाटेल असे देदीप्यमान यश मिळवले आहे. छोट्याशा गावातील युवकाने मिळवलेल्या यशामुळे शाहूवाडी तालुक्यासह तुरुकवाडी गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हर्षवर्धन याचे प्राथमिक शिक्षण श्रीराम विद्यालय राजारामपुरी कोल्हापूर येथे, माध्यमिक शिक्षण राजश्री शाहू विद्यालय जुना बुधवार पेठ, कोल्हापूर, ज्युनिअर कॉलेज विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तर बी. ई. मेकॅनिकल ही पदवी केआयटी कोल्हापूर येथे पूर्ण केली. त्यानंतर पुणे येथील टीसीएस कंपनीमध्ये एक वर्ष नोकरी केली. दरम्यान, सन २०२२ ला स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी दिल्ली येथे गेले. आणि येथे अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या यूपीएससीच्या परीक्षेत दोनवेळा अपयश आले; मात्र न खचता सातत्यपूर्ण अभ्यास करून तिसऱ्या प्रयत्नात ३४९ वी रँक मिळवत हे अवघड यश खेचून आणले. त्याच्या या देदीप्यमान यशामध्ये सध्या विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथे पदव्युत्तर भूमाहितीशास्त्र व भूगोल विभागात समन्वयक म्हणून काम पाहात असलेले प्रा. हरिश्चंद्र पाटील, आई सौ. जयश्री पाटील, कोकरूड गावचे सुपुत्र आयएएस आनंद पाटील, धन्वंतरी हॉस्पिटलचे डॉ. एस. एन. पाटील, संजय पाटील, डॉ. अजय पाटील, अजित कुंडले-पाटील, संदेश सावंत, धनंजय पाटील, अभय पाटील, विजय राठोड यांच्यासह हर्षवर्धन पाटील यांचे दिल्ली येथील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. हर्षवर्धनने अपयश आले तरी धैर्याने मिळवलेले यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

### निकाल जाहीर होताच तुरुकवाडी गावात फटाके वाजवून आनंदोत्सव

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. दरम्यान, शाहूवाडी तालुक्यातील तुरुकवाडी पैकी शाहीरवाडी गावातील सुपुत्र हर्षवर्धन पाटील याने यश मिळवल्याचे समजताच शाहीरवाडी व तुरुकवाडी गावातील युवकांनी फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी हर्षवर्धन हा केरळमध्ये बहीण हर्षदा व दाजी संदेश सावंत यांच्याकडे होता. यूपीएससी परीक्षेत हर्षवर्धनने घवघवीत यश मिळवल्याबद्दल अनेकांनी फोन करून त्याचे अभिनंदन केले. निकाल समजल्यानंतर पाटील कुटुंबाने साखर-पेढे वाटून आनंद साजरा केला.

### वारणा खोऱ्यातील युवकांची स्पर्धा परीक्षेत दमदार कामगिरी!

शिराळा व शाहूवाडी तालुक्याच्या पश्चिम भागातील अनेक गावांतील युवकांनी गेल्या काही वर्षांपासून यूपीएससी, एमपीएससी तसेच अन्य स्पर्धा परीक्षांमधून चमकदार कामगिरी करत आपल्या कुटुंबासह गावचे, तालुक्याचे नाव उज्ज्वल करत आहेत. याचा संपूर्ण वारणा व काणसा खोऱ्यातील नागरिकांना अभिमान आहे. यामध्ये नेर्लेचे पानिपतकार विश्वास पाटील, कोकरूड गावचे सुपुत्र आनंद पाटील, विश्वास नांगरे, प्रा. गजानन घोडे-पाटील, अर्जुन सूर्यवंशी, विनायक टोमके, प्रदीप पाटील, शारदा दळवी, अर्जुन घोडे-पाटील, चरणचे डॉ. राहुल वाघमारे, सोंडोलीचे उत्तमकुमार पाटील, सरूडचे सुगंध कुमार चौगले, पी. आर. पाटील, हारुगडेवाडीचे संजय अस्वले, विजय लगारे, भेडसगावचे धीरज पाटील, नेर्लेचे पाटील, मांगरूळचे फत्तेसिंगराव पाटील, प्रकाश आढाव, दीपक कांबळे, अभिजित कुंभार, नम्रता मस्के, अर्जुन मोहिते, श्रद्धा मस्के, रिळे येथील राजाराम भाकरे, तुरुकवाडी -पाटीलवाडीचे श्रीधर पाटील, नीलेश पाटील, कोतोलीचे शिवाजी सुतार, लता सुतार, बिळाशी गावातील अश्विनी कुलकर्णी-भिडे, सुनील वारे, राहुल पाटील, फुफिरेचे मारुती गायकवाड, पावलेवाडीचे शिवराज पाटील, दुरंदेवाडी येथील अलका खोत आदींसह अनेक गावांतील युवक आणि युवती विविध स्पर्धा परीक्षेत आपले वर्चस्व सिद्ध करून प्रशासकीय सेवेत चांगली कामगिरी करताना दिसत आहेत. यांच्याच पावलावर पाऊल ठेवून तुरुकवाडी पैकी शाहीरवाडी या छोट्याशा गावातील हर्षवर्धन पाटील या युवकानेही जिद्द आणि चिकाटीने यूपीएससी परीक्षेत यश मिळवून यशाची परंपरा पुढे सुरू ठेवली आहे.